Peer Reviewed

ISSN 2319-8648

Indexed (SJIF)

Impact Factor - 7.139

# Current Global Reviewer

UGC Approved International Refereed Research Journal Registered & Recognized
Higher Education For All Subjects & All Languages

Editor in Chief
Mr.Arun B. Godam

**CURRENT GLOBAL REVIEWER**

Half Yearly | UGC Approved | ISSN : 2319 - 8648
Issue VIIIVol.II, Sept. 2018 | Sr. No. 64310 | Impact Factor : 7.139

# Current Global Reviewer

UGC Approved International Research
Refereed Multidiciplanary Journal

Editor In Chief
**Mr. Arun B. Godam**

ISSUE VIII, Volume II (Half Yearly)
**Published on Sept. 2018**

**Editorial Office Address :**
Khadgaon Road, Kapil Nagar, Latur,
Dist. Latur 413512 (M.S.) India

Contact- 8149668999
Email-
hitechresearch11@gmail.com

Publisher
**Shaury Publication**
Kapil Nagar, Latur
Contact- 8149668999

**Rs. 400/-**

EXECUTIVE EDITORS

**Dr. ChittaRanjan Panda**
P.G. Deptt. Of Odia
Shailabala Women's Autonomous
College , Cuttack – (Orissa)

**B.J. Hirve**
Dept. of botany
VasantMahavidyalaya,
Kaij, Dist. Beed. (M.S.)

**Dr. U.T. Gaikwad**
Dept. of Geography,
Smt. S. D. M. College
Latur, Dist. Latur (M.S.)

**Dr. PravinDiddeshwarShete**
Dept. of Zoology, Maharashtra
UdaygiriMahavidyalaya, Udgir,
Dist. Latur

**MaimanatJahanAra**
Head, Dept of Political Science,
Sir Sayyed College,
Aurangabad, Dist. Aurangabad

**DrU.V.Panchal**
H.O.D, Dept of Commerce,
Deogiri College,
Aurangabad, Dist. Aurangabad

**Dr M.U. Yusuf**
Dept of Commerce,
Sir Sayyed College,
Auranbadad, Dist. Aurangabad

**Pro. S.B. Karande**
Dept. of Economics,
ShriBhausahebVartak College,
Borivali (W), Dist. Mumbai.

**Dr. Hanumant Mane**
R.Guide& Head,
Dept. of Marathi,
Shivchatrapati College,
Kalam, Dist. Osmanabad(M.S.)

**Dr. SachinKadam**
Dept. of Hindi
Nagarpalika Art D.J. Malpani Comm.
& B.N. Sarda Sci. College,
Sangmner, Dist. Ahmadnagar (M.S.)

***www.rjournals.co.in***

**CURRENT GLOBAL REVIEWER**

Half Yearly | UGC Approved | ISSN : 2319 - 8648
Issue VIIIVol.II, Sept. 2018 | Sr. No. 64310 | Impact Factor : 7.139

# Index


| Sr. No. | Article Title | Author | Page No. |
|---|---|---|---|
| 1 | Regular Exercise: A Need of Time | Dr.Nirajkumar N. Uplanchwar | 5 |
| 2 | लोक साहित्य के विविध रूप | स. प्रा. डॉ. राजेश प्रल्हादराव आरदवाड | 8 |
| 3 | खरगोन जिलेमें लाल मिर्चव्यवसाय में कार्यशील पूँजी काविश्लेषणात्मक अध्ययन | विष्णुप्रसादबैसवार<br>डॉ दिनेश अग्रवाल | 11 |
| 4 | स्त्री सबलीकरण काळाची गरज | डॉ.एस.पी. गायकवाड | 15 |
| 5 | पेशवेकालीन न्यायमुर्ती राम शास्त्री प्रभुने | डॉ. पाटील विनायक उध्दवराव | 19 |
| 6 | आयसीटी साधनसामुग्री आर्टस् ,कॉमर्स आणिसायन्स कॉलेज-कराड आणि पाटण तालुका: एक अभ्यास | प्रा. अनिल शिवाजीपाटील | 22 |
| 7 | स्वातंत्र्याचा जाहिरामा : जे समुत्तिसुत्त | डॉ. बालाजी मा. गव्हाळे | 34 |
| 8 | मनोरंजन | डॉ. सतीश नारायण लोमटे | 38 |
| 9 | साहित्यरत्न अण्णाभाऊसाठे यांचेकादंबरीलेखन | प्रा. गोरोबा शेषेराव रोडगे | 41 |
| 10 | आधुनिक स्त्री की दास्तान-"चाक" | डॉ. सुभाष इंगळे | 45 |

**CURRENT GLOBAL REVIEWER**

Half Yearly | UGC Approved | ISSN : 2319 - 8648
Issue VIIIVol.II, Sept. 2018 | Sr. No. 64310 | Impact Factor : 7.139

# साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांचे कादंबरी लेखन

प्रा. गोरोबा शेषेराव रोडगे
मराठी विभाग प्रमुख, शिवनेरी महाविद्यालय, शिरुर अनंतपाळ,जि. लातूर

**प्रस्तावना :**

महाराष्ट्राला प्रबोधनाची प्रदीर्घ अशी परंपरा लाभलेली आहे. तद्वतच या महाराष्ट्राला महापुरुषांच्या विचारांची आणि त्यांच्या अखंड कार्याची दैदिप्यमान असा वारसाही लाभलेला आहे. आपल्या शाहिरीतून महाराष्ट्रातील पुरोगामी चळवळीची ज्वाला तेवत ठेवण्यात अनेक शाहिरांचे महत्वपूर्ण आणि वैशिष्टपूर्ण योगदान राहिलेले आहे. त्यातीलच एक म्हणजे 'पृथ्वी ही शेषाच्या मस्तकावर तरलेली नसून, कष्टकरी, कामगारांच्या तळहातावर तरलेली आहे.' असे विज्ञानवादी विचार मांडणारे साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे होत.

मनोरंजनातून प्रबोधन आणि प्रबोधनातून परिवर्तनाचा संदेश देणारे महान समाजसुधारक, वास्तवादी साहित्यिक म्हणजे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे होत. ज्या समाजात विचारवंत, साहित्यिक, लेखक, कवी, कथाकार, कादंबरीकार, गीतकार, शाहीर आणि कलावंत निर्माण होतात ते आपल्या अंगभूत प्रतिभेनं समाजात घडवित असतात समाजाला विधायक वळणावर म्हणजेच उन्नतीच्या शिखरावर अग्रेसर करण्याची महत्वपूर्ण भूमिका बजावत असतात.

प्रख्यात विनोदी वक्ते व साहित्यिक प्र.के.अत्रे अण्णाभाऊच्या लेखनाबद्दल लिहितात कि, जगण्यासाठी लढणाऱ्या माणसाची कथा लिहिणारा लेखक म्हणजे अण्णाभाऊ होय. लोकशाहिर अण्णाभाऊ यांनी आपल्या जीवनात जगण्यासाठी तीव्र संघर्ष केल्याचे आपणास दिसून येते. अण्णाभाऊंनी वास्तववादी परिस्थितीवर जास्त भर देऊन जमीनदार, भांडवलदार यांच्याकडून होणारे शोषण आणि समाजातील बेकारी, दारिद्र्य महिलांवर होणारे अत्याचार या विविध विषयावर साहित्याच्या माध्यमातून तीव्र आत्मचित्रण केले. 'प्रामुख्याने अण्णाभाऊचे वास्तवादी साहित्य म्हणजे एक शोषणाविरुध्दचे एल्गारच होते.'

अण्णाभाऊसाठे यांची जीवननिष्ठा व भूमिका कथा, कादंबरी, नाटक, प्रवासवर्णन, पोवाडे आणि लावणी या विविधांगी रचनेतून प्रतिबिंबित झाला आहे. ध्येयवादी लेखकच ध्येयवादी नायक नायिका आपल्या कथा—कादंबरीतून चित्रित करतो. 'फकिरा' या नव्या समाजव्यवस्थेचा प्रतिनिधी नायक, प्रामुख्याने त्याची लढाई ही मानवमुक्तीची, त्यांच्या अस्तित्वाची , लोकशाहीवादी शोषणमुक्तीची आणि नंतरच्या प्रत्येक पिढीची प्रेरक शक्ती शोषकांना जाहिरपणे, निर्भिडपणे प्रश्न विचारणारे नायक आणि नायिका चित्रित करुन शोषितांची बाजू निर्धारपूर्वक मांडली.

अण्णाभाऊ साठे हे एका विशिष्ट जातीचे, जमातीचे व एका समाजाचे नव्हेत तर ते जगातील तमाम कष्टकऱ्याचे, पीडितांचे, शोषितांचे प्रतिनिधी होते. वैचारिक आणि सामाजिक बांधिलकी हे त्यांच्या लेखनाचे प्रभावी सुत्रे होते. त्यांनी साहित्य रसिकांना आणि कामगार, श्रमिक, कष्टकरी पीडीत—शोषितांना, दीन—दुबळ्यांना तू गुलाम नाहीस तर तू या वास्तव जगाचा निर्माता आहेस, असा प्रेरक प्रखर परिवर्तनवादी संदेश त्यांनी

**CURRENT GLOBAL REVIEWER**

| Half Yearly | UGC Approved | ISSN : 2319 - 8648 |
|---|---|---|
| Issue VIIIVol.II, Sept. 2018 | Sr. No. 64310 | Impact Factor : 7.139 |


आपल्या कादंबरीतून देण्याचे कार्य केले आहे. एकंदरीत हरलेल्या माणसाला स्वाभिमानाची जाणीव करुन दिली.

**साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांचे कादंबरीलेखन :**

अण्णाभाऊंचे साहित्य हे आंदोलन आहे. त्यांनी अनेक कादंबऱ्या लिहिल्या त्यांच्या कित्येक कादंबऱ्यावर चित्रपट निघाले. त्यात साताऱ्याची तऱ्हा (अलगुज), टिळा लावते मी रक्ताचा (आवडी), डोंगरची मैना (माकडीचा माळ), फकिरा, मुरली मल्हारी रायाची (चिखलातील कमळ), वारणेचा वाघ, बारागावचे पाणी (वैजयंता) अशी चित्रपटांची यादी आहे. अण्णांनी लिहिलेल्या साहित्याचा रशियन, पोलीश, इंग्रजी, फ्रेंच इत्यादीसह जगातील २७ भाषांमध्ये अनुवाद केलेला आहे. अण्णाभाऊंच्या कादंबऱ्या जशा पुरुष प्रधान आहे तशा त्या स्त्रीप्रधानही आहेत. त्यांची स्त्रीमागे ही मनाची जीवन जगणारी आहेत. ती चैन करणाऱ्या प्रवृत्तीची नाहीत. समाजातील बंधने तिच्यावर आहेत. जीवन जगणाऱ्या अधिकाराची पायमल्ली होताच ती पेटून उठते व रणांगणांत लढावे तशी ती लढते.

थोर साहित्यीक अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्यात कष्टकरी बहुजन समाजाचे वास्तवादी चित्रण दिसून येते. त्यांच्या साहित्यातून दारिद्रय, विषमता, बेकारी, वेठबिगारी बलुतेदार, कामगार, शेतकरी, शेतमजूर, भिकारी असा समाज एका बाजूला तर चैनित जीवन जगणारे जमीनदार, सावकार, व्यापारी, भांडवलदार, असा वर्ग दुसऱ्या बाजूला दिसून येतो. 'वारणेच्या खोऱ्यात' ही कादंबरी १९४२ ची ज्यात शेतकऱ्यांची जमीन बळकावणाऱ्या सावकारांविरोधी शेतकरी संघर्ष उभा करुन आपली जमीन मालकी परत मिळवतात. याचे वास्तुनिष्ठ चित्रण अण्णाभाऊ रेखाटतात. 'चित्रा' कादंबरीतून भांडवलशाहीने जनसामान्यांचे शोषण केल्याचे आणि गर्भश्रीमंत वर्णाला चैनीची वस्तू म्हणून कच्या मालाबरोबर तरुण मुलींचीही निर्यात होत होती असे चित्रण पुढे येते. 'फकिरा' कादंबरीतून दुष्काळामुळे आणि रोगाच्या साथीने मृत्यूमुखी पडणारी माणसे पाहून फकिरा हा एका वडार जमातीतील व्यक्तीच्या मदतीने सरकारी खजिना लुटतो. आणि त्याचे वाटप फकिरा समान पातळीवर करतो. 'आवडी' कादंबरीतून स्त्रीचे शोषण करणारी पितृसत्ताक वर्चस्वाची व्यवस्था नाकारल्याचे आणि ग्रामीण जाती व्यवस्थेच्या समस्या आणि त्यातून निर्माण झालेली श्रेष्ठ–कनिष्ठत्वाचा भाव याचे एकंदरित चित्रण अण्णाभाऊनी रेखाटलेले आहे.

'फकिरा' कादंबरीबरोबरच 'माकडीचा माळ' या कादंबरीत त्यांनी भटक्या विमुक्तांचे विश्व पहिल्यांदा मराठीत आणले. सुगीच्या दिवसात गावाबाहेर राहणाऱ्या भटक्या विमुक्तांचे वर्णन त्यात होते. भटक्या विमुक्त जमातीतील डवरी, डोंगरी, दरवेशी, माकडवाले, साप गारुडी, तुरेवाले, भानामतीवाले, गोसावी, पारधी, नंदीवाले, शिकलगार अशा कितीतरी जमातीचे जीवन त्यांनी एका सुत्रात गुंफले. त्यांच्या 'वैजयंता' या कादंबरीतून स्त्री शोषणाविरुध्द उभी राहिलेली स्त्री दिसते. धनगर, रामोशी यांचे जीवन त्यांनी रेखाटले व त्यांच्यातील कर्तत्ववान माणसांचा इतिहास सांगितला. 'मास्तर' कादंबरीतील मास्तर धनगराच्या मेंढरात जाऊन बसतो. मेंढरामुळेच व तिथे मास्तराची स्वातंत्र्याची चळवळ हीन शिकलेल्या धनगराला समजली होती. पण शिकून फौजदार झालेल्या ब्रिटिश सरकारच्या आदेशाचे पालन करुन गुलामीत जीवन जगणाऱ्या सुशिक्षित माणसाला समजली नव्हती. हेच अण्णाभाऊ साहित्यातून मांडतात.

अण्णाभाऊंनी 'फकीरा' ही कादंबरी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या झुंजार लेखणीस अर्पण केली आहे. 'फकीरा' हा देखील एक झुंजार वीरनायक आहे. दलितांना–उपेक्षितांना दास्यमुक्तीचा संदेश डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिला. सामाजिक समतेसाठी सतत संघर्ष करत राहत दलितांना 'माणूस' म्हणून जगण्याची प्रेरणा बाबासाहेबांनी दिली. स्वातंत्र्य, समता, बंधुता या जीवनमूल्यांच्या प्रतिष्ठापनेसाठी बाबासाहेब अविरत कष्टात राहिले. मानवमुक्तीचा जाहीरनामा जणूत्यांनी मांडला. अशा प्रेरक व्यक्तीमत्वाच्या आदरपूर्वक पुजेसाठी फकिराची झुंजारकथा बाबासाहेबांना अर्पण करण्यात अण्णाभाऊंनी औचित्य साधले आहे.

'फकिरा' हा प्रत्यक्षातला वीरपुरुष ज्याची दखल इतिहासाला नाही त्याच्या विरकथेचा पाठपुरावा अण्णाभाऊंनी केला आहे. अण्णाभाऊंनी पहिली गुटी खजिन्यातील लुटीच्या पैशाची खाल्ली आहे. इंग्रजांचा खजिना फकिराने लुटला होता अशा अपेक्षित अंधारात असलेल्या फकिराला कादंबरीतून साकारण्याचा प्रयत्न अण्णाभाऊंनी केला आहे. फकिराला वीरनायकाची पात्रता मिळवून देणाऱ्या घटना जिव्हाळ्याने अण्णाभाऊंचा निवेदक मांडतो. 'वारणेच्या खोऱ्यात' या कादंबरीचे निर्मिती प्रयोजन अण्णाभाऊ सांगतात, 'वारणा नदीच्या खोऱ्यात माझ्या आयुष्यातील बरेच दिवस मी घालवलेले आहेत तो सुंदर खोरा मी अगदी जवळून पाहिला आहे ते सारे एका सुत्रात ओवून त्याची एक कथारुपी माला गुंफून ती मराठी साहित्याच्या गळ्यात घालावी असे मला एक सारखे वाटत होते.'

'वारणेच्या खोऱ्यात' या कादंबरीतील मंगल ही नायिका शेताकडे जेवन घेऊन निघते, तेव्हा नायकासंबंधी ती विचार करीत असते 'आज आपण एका मनुष्याला अगदी जवळून पाहणार आहोत ज्याची किर्ती सर्व खोऱ्यात पसरली आहे. ज्याचे नाव ऐकुन मानी माणसाला अभिमान वाटतो ज्याचे इंग्रजी सत्तेला आव्हान दिले आहे व जो गोष्टिनं गोळीचा जाब देतो आहे आणि गोरगरिबांना जो आपला आधार वाटतो, घरोघर लोक ज्याच्या नावाची चर्चा करतात तो माणूस आज मला दिसणार. '' नायिकेचे हे विचार सर्वसाक्षी निवेदकाच्या निवेदनातून कळतात, यातून हिंदुराव या नायकाबद्दलचे वाचकाचे चांगले मत आपोआपच तयार केले जाते. एका पात्राच्या मनात दुसऱ्याबद्दल काय वाटते, ते निवेदक वाचकाला सांगतो आहे. अशा तऱ्हेने नायकाची व्यक्तीरेखा ठळक केली गेली आहे.

'वारणेचा वाघ' या कादंबरीत नाट्यत्म संघर्ष असलेल्या अनेक लहान मोठ्या घटनांमधुन कथानक घडत जाते व सत्तू भोसले या वीर नायकाचे व्यक्तीत्व आकाराला येते. सामान्य व ढासळू पहाणाऱ्या गरीब कुटूंबात सत्तुचा जन्म होतो. वारणेच्या वाहत्या काठावर वारणेचा पोषक जीवनप्रवाह खचखळग्यातून वाहत राहतो त्याचप्रमाणे कुमेजच्या सत्तुचा जीवनप्रवाह जनसामान्यांना सहाय्यभूत होत संघर्षमय राहणारा आहे.

'वैजयंता' ही अण्णाभाऊंनी तमाशा कलेवर बेतलेली कादंबरी. नर्तकी गजरा आपल्या मुलीला तमाशात न नाचवता चांगले जीवन देण्याचे स्वप्न पाहते. परंतु एकदा तरुण चंद्रा व गजरा यांच्या कलगी तुऱ्यात गजरा हरते व चंद्राचा पराभव करण्यासाठी वैजयंताला तमाशात आणते, भांडवली व्यवस्थेत स्पर्धा असते व दुसऱ्याचा द्वेष केल्याशिवाय माणसं स्पर्धा जिंकू शकत नाहीत. माणसं बेफान होतात ईर्षेला पेटतात व आयुष्याची राखरांगोळी करुन घेतात. तमाशातील स्त्रियांच्या वाट्याला येणारे सारे दुःख पुढे वैजयंताच्या वाट्यला येते. तमाशा ही पोटार्थी कला असली तरी अण्णाभाऊंच्या स्त्री नायिका आपलं शील विकत नाहीत. त्यासाठी प्राणपणाने संघर्ष करतात. आपल्या

समाजव्यवस्थेने पाटलाची स्थिती व ब्राम्हणांची जयश्री चित्रपटातील तमाशात नाचली तर नर्तकी ठरते पण मांगाची विठा तमाशात नाचली तर ती नाचीन ठरते.

'चिखलातील कमळ' ही कादंबरी मुरळीच्या जीवनकथा सांगते. तुळसाला पाटलापासून सीता होते व पाटलाच्या आजारपणात त्याला बरे वाटावे म्हणून खंडोबाला नवस करुन तुळसा सीतेला मुरळी बनवते एका पिढीचा भोगवटा दुसऱ्या पिढीकडे चालू राहतो. स्त्री भोगवस्तू उच्च जातीयांची दासी इथपर्यंत ही कादंबरी गजल गाठते.

**समारोप :**

अण्णाभाऊंच्या कादंबऱ्यातील सर्व पात्रे त्यांच्या भाषेत सांगावयाचे म्हणजे ही माझी माणसे असल्याने मी त्यांना कुरुप करत नाही. त्यांची प्रतिज्ञा असल्याने एका सत्वशील नीतिमत्व, सत्याला आदर्श मानणारी माणसे त्यांच्या कादंबऱ्यामध्ये आपल्याला भेटतात. खरे अण्णाभाऊंचे साहित्य हे जीवनातील कुरुपतेला प्रकाशात आणते. अण्णाभाऊ जीवनातल्या सौंदर्यावरच लिहिते राहिले खरे त्यांना कुरुपता फार समर्थपणे चितारता आली असती पण त्यांनी सभ्यपणाची संस्कृतपणाची स्वप्ने पाहत लिखाण केले आहे.

**संदर्भसूची**

१. प्रा. श्रीकांत मुद्दे– चळवळ जगलेला शाहीर अण्णाभाऊ साठे, दै सम्राट दि. १ ऑगस्ट २०१७
२. राही भिडे– शोषित, वंचितांचा बुलंद आवाज, दै.पुण्यनगरी दि. १ ऑगस्ट २०१९
३. पांडुरंग मामीडवार– साहित्याचा कोहिनूर हिरा, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे, दै. एकमत दि. १ ऑगस्ट २०१७
४. डॉ.उज्वला हातागळे– जगबदल घालुनी घाव... दै. सकाळ दि. १ ऑगस्ट २०१९
५. आसाराम गायकवाड (संपादक)– लोकशाहीर तथा लोकलेखक अण्णाभाऊ साठे, झेप प्रकाशन, नाशिक, प्रथम आवृत्ती ऑगस्ट १९९६.

Current Global Reviewer

ISSN 2319-8648

Peer Reviewed

ISSN 2319-8648

Impact Factor - 7.139

UGC Approved Journal
Sr. No. 64310



Edited By
Arun B. Godam
Latur, Dist. Latur-413512
(Maharashtra, India)
Mob. 8149668999

SHAURYA PUBLICATION
Latur

Publisher
Shaurya Publication

www.rjournals.co.in